# यावल महाविद्यालयात जागतिक आदिवासी दिन साजरा

यावल (प्रतिनिधी )येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग, आदिवासी समाज सहायता कक्ष व आय. क्यू. ए. सी. यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 09 ऑगस्ट 2021रोजी जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिनाचे औचित्य साधून ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख वक्ता म्हणून शिंदखेडा महाविद्यालयातील प्राणी शास्त्र विषयाचे प्रा. जयसिंग पावरा उपस्थित होते .कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान उपप्राचार्य प्रा . एम. डी. खैरनार यांनी भूषविले .

प्रा.आर .डी .पवार यांनी आपल्या प्रास्ताविकात आयोजनामागची भूमिका सादर केली .प्रमुख वक्ते प्रा. जयसिंग पावरा यांनी" आदिवासी विद्यार्थी व त्यांच्या समस्या "या विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात असे सांगितले की जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यामागील मूळ उद्देश समजून घेणे गरजेचे आहे.1994 पासून हा दिवस साजरा केला जात आहे .आदिवासी समाजाला त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे ,त्यांना अधिकाधिक शिक्षणाच्या प्रवाहात आणणे व सरकारी योजनांची माहिती करून देणे, यासाठी त्यांच्यात जागृती करणे आवश्यक आहे. स्वतःचा व समाजाचा उद्धार करायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. असे देखील त्यांनी नमूद केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा.एम.डी. खैरनार यांनी क्रांतिकारकांच्या योगदानाचा उल्लेख करून, त्यांच्या कार्याचा आढावा सादर केला.

**कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुधा खराटे यांनी तर आभार विद्यार्थी विकास विभाग प्रमुख डॉ. एस. पी. कपडे यांनी मानले .सदर कार्यक्रमात शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थी उपस्थित होते .प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .**

**कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपप्राचार्य प्रा. ए. पी .पाटील आदिवासी समाज सहायता कक्ष प्रमुख डॉ. पी. व्ही .पावरा ,आई. क्यू. ए. सी.चे समन्वयक प्रा. एस .आर. गायकवाड, डॉ. एच. जी .भंगाळे, प्रा. संजय पाटील व मिलिंद बोरघडे यांचे सहकार्य लाभले.**


2021/8/9 17:20